ISSN 2394-5303

# printing AREA

Issue-41, Vol-02, May-2018

International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203

# Index

01) KHAP PANCHAYAT AND GENDER BASED DISCRIMINATION
RUCHI AGARWAL—(DR.) N.K. THAPAK, Sagar, M.P. || 10

02) Challenges to Morden India under article-21& Right to privacy
Mr. Dr. Saurabh R. Bhatt, Himatnagar || 15

03) Sustainable Village Development: Some Indian Experiences
Gopal Dhavade—Dr. Manjusha Musmade, Pune || 17

04) A Study of Anxiety among CHB & Permanent Teachers in ShirpurTahasil
Dr. N. S. Dongare, Shirpur, Dist-Dhule || 20

05) Relationship Between Family Environment and Mental Health
Dr. Deepti Gaur, Mathura, U.P. || 25

06) A Study of Women in production of Hand made jewellery and their prospectus
Dr. A. Sujatha — Gunasri .G, Bodinayakanur. || 28

07) STUDY ON IMPLEMENTATION AND APPLICABILITY OF G.S.T.
Dr.Anuradha Jadon—V. Tiwari—V. Dwivedi—Y. Paliwal || 32

08) AN OVERVIEW OF SOCIO-ECONOMIC IMPACTS OF AGRICULTURAL TAXATION
Shivaji Singh, Allahabad || 40

09) Green Supply Chain Management
Saloni Sharma—Dr. Piyush kendurkar, Indore || 50

10) A STRATEGY ON HORTICULTURE DEVELOPMENT IN BIHAR
Dr. Radha Bhushsan Yaday || 54

11) Analysis on measuring the factors affecting Employee Engagement in Chemical......
MR. RAHUL H. TIWARI, Vapi, Gujarat || 59

12) Role of Body Language in Non-Verbal Communication
Dr. Lattakumari Dwarkaprasad Sharma, Mehsana, Gujarat || 64

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

http://www.printingarea.blogspot.com — www.vidyawarta.com/03

13) A DISTRIBUTED MANAGEMENT METHOD BASED ON THE ARTIFICIAL FISH-SWARM MODEL IN....
**Bommagani Rohini, Hyderabad** || 67

14) Practicing Academic Honesty and Integrity in Research
**S. Nagaraju, Hyderabad.** || 72

15) Contribution of middle income group in economic development of country
**Dr. Anupama Nitin Labhe** || 76

16) AWARENESS & UTILIZATION OF E-RESOURCES AMONG THE POST GRADUATE......
**P. Jegan—Dr. M. Jayaprakash, Salem** || 78

17) बालकातील कुपोषण कमी करण्यात "अंगणवाडयांचे योगदान"
**प्रा.कु. सुषमा ज. फरसोले, गाडेगांव (तेल्हारा) जि.अकोला** || 84

18) प्राथमिक शिक्षकांची अंवांतर वाचन अभिरूची व अध्यापन अभियोग्यता—एक....
**डॉ. राजेश चंदनपाट, गडचिरोली. महाराष्ट्र** || 89

19) बँकींग व्यवहारासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलाच्या उभारणीचा चिकित्सिक अभ्यास
**डॉ. कारभारी बबनराव दिवटे, धुळे** || 92

20) पंडित जवाहरलाल नेहरु व गोवा विलिनीकरण
**प्रा.संतोष म.घुगे, पुणे.** || 95

21) भारतीय संत्रा (मॅंडरीन) उद्योग
**प्रा. सतिश आर. जाधव, मोवाड.** || 102

22) केतन पिंपळापुरे यांची कविता:आस्वाद आणि मीमांसा
**प्रा.डॉ. सुरेश दयाराम खोब्रागडे, ता.लाखनी, जि. भंडारा** || 106

23) नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भूमि उपयोजन : एक भौगोलिक अभ्यास
**प्रा. डॉ. यु. एस. कानवटे, , वसरणी, नांदेड.** || 113

24) सहयोगीनी : बचत गट विकासाचा महत्वाचा कणा
**प्रा. मनिष प्र. मुडे, कामठी** || 116



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri 415203

http://www.printingarea.blogspot.com

25) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील राष्ट्रवीरकार शामराव देसाई यांचे योगदान
प्रा.विशाल रामदास रोकडे, ता.पारनेर, जि.अहमदनगर || 118

26) कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांची शेती आणि सिंचन व्यवस्थेचे अध्ययन
प्रा.डॉ. एन.बी. पोहकर, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली || 121

27) महावीर जोंधळे यांच्या 'जनगोत' या व्यक्तिचित्राचा अभ्यास
डॉ. जगन्नाथ चौधरी—श्री. निलेश प्रभाकर शेळके || 124

28) वस्तू व सेवा कर:एक संक्षिप्त आढावा
डॉ. वाल्मिक दगडू परहर, ता. मंडणगड,जि. रत्नागिरी || 130

29) महाविद्यालयीन ग्रंथपालाचे कार्यसमाधान—एक अभ्यास
प्रा. रेवाराम एम. मालखेडे, ता.नरखेड, जि.नागपूर || 133

30) नाशिक जिल्ह्यातील जैन लेणी
डॉ.व्ही.एस.देसले- प्रा. जाधव नितीन साहेबराव || 138

31) राष्ट्रीय जागरण एवं उत्तरप्रदेश की पत्र—पत्रिकायें—एक ऐतिहासिक विवेचन
डा० अश्विनी कुमार, भुता, बरेली || 145

32) नगरीकरण का इतिहास
मुकेश चन्द्र—डा० रश्मि पंत, पिथौरागढ़ (उत्तराखण्ड) || 150

33) प्रगतिशील साहित्य और केदारनाथ अग्रवाल
संतोष नागरे, गेवराई जि.बीड || 156

34) भारतीय दर्शन और मानव संसाधन प्रबन्ध
डा.आर.एस. बांगड़, भीलवाड़ा (राजस्थान) || 159

35) गुरुदेव रवीन्द्रनाथ टैगोर का शैक्षिक चिन्तन
कपिल भारद्वाज—डॉ. रीतु बाला, श्रीगंगानगर (राज.) || 161

36) देवेश ठाकुर के कथा साहित्य में व्यंग्य
छत्रपति पंत, अल्मोड़ा। || 166

www.vidyawarta.com/03



PRINCIPAL

37) 'बदला' कहानी में सांप्रदायिक सद्भाव
प्रा. संतोष धोत्रे, पुणे. || 178

38) आंचलिक उपन्यासों की परम्परा में 'मैला आँचल'
आशुतोष तिवारी, दिल्ली || 181

39) प्राचीन भारत में राष्ट्रीय चेतना
डॉ० विवेकानन्द उपाध्याय, देवरिया (उ० प्र०) || 184

40) वर्तमान परिदृष्य में मानवीय मूल्यों से युक्त अध्यापक की आवश्यकता
डा० अर्चना अग्रवाल—गौरव सिंह, लखनऊ || 186

41) भारतीय तुलनात्मक साहित्य के परिप्रेक्ष्य में 'चित्रलेखा व संस्कार' का तुलनात्मक अध्ययन
उमा सैनी, दिल्ली || 189

42) उत्तराखण्ड की प्राकृतिक आपदाएं एवं न्यायिक अभिमत
डॉ० गीता श्रीवास्तव—डॉ० सुशील कुमार श्रीवास्तव, उत्तराखण्ड || 192

UGC Approved Journal
Jr.No.43053

International Multilingual Research Journal

Printing Area

9850203295 7588057695

Editor Dr.Bapu G.Gholap



www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203

28

# वस्तू व सेवा कर: एक संक्षिप्त आढावा

डॉ. वाल्मिक दगडू परहर
लोकनेते गोपीनाथजी मुंडे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याय,
मंडणगड, ता. मंडणगड,जि. रत्नागिरी

**********

• **प्रस्तावना**

आधुनिक अर्थव्यवस्थेत कर ही एक फारच महत्त्वाची संकल्पना आहे. कर हा सार्वजनिक आयव्ययातील महत्त्वाचा घटक आहे. कर हे केवळ सरकारी महसूलाचे साधन नसून समाजातील उत्पन्नाचे पूनर्वितरण, महत्तम सामाजिक कल्याण, भाववाढ रोखणे, क्रयशक्तीचे हस्तांतरण, रोजगार निर्मीती व आर्थिक स्थैर्य अशी सामाजिक व आर्थिक उदिष्टये साध्य करण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे. करारोपणाचे आर्थिक आणि मानसिक परिणाम होत असतात. म्हणून ॲडमस्मिथ यांच्या मते 'कर पद्धती ही आदर्श (Good or Ideal) असावी.' करारोपणात समता, न्याय, निश्चितता, सोयीस्करपणा, मितव्ययतेचे तत्व अंतर्भूत असावे अशी करप्रणाली समाजहिताच्या दृष्टिने उपयुक्त मानली जाते. भारतात असणारी करप्रणाली अत्यंत क्लिष्ट, किचकट व गुंतागुंतीची आहे. सर्वसामान्यपणे ही करप्रणाली सामान्य करदाते, उपभोक्ते यांच्या आवाक्याबाहेरील असून अस्तित्वात असणारी करप्रणाली सुलभ व सुटसुटीत करणे, कर आकारणीतल बहुविधा टाळणे, संपूर्ण देशामध्ये एक समान कर पद्धती या उद्येशाने वस्तू व सेवा कर पद्धतीचा स्विकार करण्यात आला आहे.

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. वस्तू व सेवा करा संबंधित संदर्भ पुस्तके, मासिके, शासकीय अहवाल, वृत्तपत्रे आदीमधून माहिती संकलित केली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे सदरचा शोधनिबंध तयार केला असून लेखात भारतातील वस्तू व सेवा करप्रणालीचा आढावा घेण्यात आला आहे.

• **वस्तू व सेवा कर संकल्पना:**

वस्तू व सेवा कर हा एक सर्व प्रकारच्या वस्तू व सेवांवर आकारला जाणारा एकाच स्वरूपाचा कर आहे. एक देश, एक कर, एक बाजारपेठ म्हणजे वस्तू व सेवा कर होय. केंद्र व राज्य सरकारच्या वेगवेगळया करप्रणालींना हा एक पर्यायी कर आहे. वस्तू व सेवा करामध्ये केंद्र व राज्य सरकारचे १५—२० कर एकत्रित करण्यात आलेले आहेत. वस्तू व सेवा कर हा उपभोगावर आधारित कररचनेच्या तत्वावर आधारित असून उपभोग घेतलेल्या वस्तू व सेवांवर हा द्यावा लागणार आहे. एक देश एक करामुळे देशात एकाच वस्तूची किंमत सर्वत्र एकसारख्या असणार आहेत मात्र जीएसटीच्या दरानुसार काही वस्तू स्वस्त तर काही वस्तू महाग असणार आहेत.

भारतात वस्तू व सेवा कर अंमलबजावणीमागील मुख्य उद्येश म्हणजे अस्तित्वात असणारी करप्रणाली सोपी व सुटसुटीत करणे, उपभोक्त्यांवरील करांचा बोजा कमी करणे आणि उत्पादक व ग्राहकांवर समानतेच्या तत्वानुसार कर आकारणी करणे.

• **वस्तू व सेवा कराचा इतिहास:**

जगात सद्या वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी करणारे सुमारे १६० देश असून त्यात भारत जोडला गेला आहे. सर्व प्रथम सन १९५४ मध्ये कर चुकवेगिरीला आळा घातला जावा म्हणून या करप्रणालीचा स्विकार फ्रान्सने केला आहे. भारतातील वस्तू व सेवा कराची ऐतिहासिक पार्श्वभूमी दीर्घकालिन आहे. सन १९९४ मध्ये अमरेश बाघची यांनी अहवालात मुल्यवर्धित करा (VAT) ऐवजी वस्तू व सेवा कराची शिफारस केली आहे. सन २००० मध्ये तत्कालिन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कारकिर्दीत वस्तू व सेवा कराची संकल्पना पुढे आली. पश्चिम बंगालचे अर्थमंत्री असीम दासगुप्ता यांच्या अध्यक्षेतेखाली वस्तू व सेवा कराबाबत समिती नियूक्त केली. सन



PRINCIPAL

२००३ मध्ये विजय केळकर समितीने अप्रत्यक्ष कर सुधारणांचा भाग म्हणून वस्तू व सेवा कराची शिफारस केली. २८ फेब्रुवारी २००६ मध्ये अर्थमंत्र्यांनी २००६—०७ च्या अंदाजपत्रकात जाहिर केली. भारतात सन २०१० मध्ये पश्चिम बंगालमध्ये सर्व प्रथम वस्तू व सेवा कर लागू केला. सरकारने विविध राज्यातील वस्तू व सेवा कराच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी राज्यांच्या अर्थमंत्र्याची संयुक्त समिती स्थापन केली. केंद्र व राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या वस्तू व सेवा कराच्या आराखडयाबाबत (रचना) अहवाल सादर केला. सरकारने नोव्हेंबर २००९ मध्ये जीएसटीबाबत प्रथम चर्चा पत्र (First Discussion Paper) प्रकाशित केले. २२ मार्च २०११ रोजी घटना दुरूस्ती विधेयक (११५ वी दुरूस्ती) मांडले. त्यावर संसदेत चर्चा करण्यात आली. १९ डिसेंबर २०१४ रोजी घटना दुरूस्ती विधेयक (१२२ वी दुरूस्ती) लोकसभेत मांडण्यात आले आणि ते ६ मे २०१५ रोजी लोकसभेत समंत झाले. ३ जुलै २०१५ रोजी 'वस्तू व सेवा कर घटना दुरूस्ती विधेयक २०१४' हे सुधारणा व दुरूस्त्यांसह १२२ वे घटना दुरूस्ती विधेयक म्हणून संसदेत सादर केले. सुधारित जीएसटी घटना दुरूस्ती विधेयक ३ ऑगस्ट २०१६ ला राज्यसभेत तर ८ ऑगस्ट २०१६ ला लोकसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले. या विधेयकास सप्टेंबर २०१६ मध्ये राष्ट्रपतींची मंजूरी मिळाली. १६ जानेवारी २०१७ रोजी जीएसटीची अंमलबजावणी १ एप्रिल ऐवजी १ जुलै २०१७ पासून करण्याची अर्थमंत्र्यांची घोषणा आणि ४ मार्च २०१७ वस्तू व सेवा कराच्या मसुद्यास सर्व राज्यांची मंजूरी मिळाली. २९ मार्च २०१७ ला केंद्रीय वस्तू सेवा कर (CGST), एकात्मिक वस्तू व सेवा कर (IGST), केंद्रीय भुप्रदेश वस्तू व सेवा कर (Union Territory GST) आणि राज्य नुकसान भरपाई ही चार विधेयके २९ मार्च २०१७ ला लोकसभेत तर ६ एप्रिल २०१७ ला राज्यसभेत मंजूरी मिळाली. घटनेतील दुरूस्त्या व संसदेमधील मंजूरीनंतर ०१ जुलै २०१७ रोजी जम्मू काश्मीर राज्य वगळता देशभर वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी करण्यात आली.

**• वस्तू व सेवा कररचना (कोणत्या वस्तू व सेवांवर किती कर):**

वस्तू व सेवा कर भारतीय आर्थिक सुधारणेतील महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखला जातो. ही करप्रणाली करदरांबाबत पाच स्तरात विभागली असून वस्तू व सेवांवर शुन्य टक्के, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, आणि २८ टक्के दराने जीएसटी आकारली केली आहे. जीएसटीतून प्राप्त कर महसूतील केंद्र व राज्याला समान वाटा मिळणार आहे.

**१) शुन्य टक्के कर:** यात जीवनाश्यक वस्तू अन्नधान्यासह

**२) ५ टक्के कर:** दैनदिन वापरातील वस्तू व सेवा प्रामुख्याने साखर, चहा, कॉफी, रॉकेल, १००० पेक्षा कमी किंमतीची कपडे, ५०० पेक्षा कमी किंमतीची पादत्राणे, घरगुती गॅस, अगरबत्ती, काजू, इन्सुलिन, मसाले, कोळसा, वाहतूक सेवा, रेल्व व विमान तिकीटे, टॅक्सी सेवा, लहान हॉटेल्स इत्यादी.

**३) १२ टक्के कर:** ग्राहक व शालेय उपयोगी वस्तू व सेवा यात मस्का, तूप, बदाम, फळाचा रस, टुथ पावडर, मोबाइल, सायकल, भांडी, मांस, खेळाचे साहित्य, चित्रकला पुस्तके, ड्रॉईग बुक, पेन्सिल, शार्पनर, इत्यादी.

**४) १८ टक्के कर:** ग्राहकपयोगी वस्तूंमध्ये केसाचे तेल, टुथपेस्ट, साबण, आईस्क्रीम, संगणक, प्रिंटर, शीतबंद भाज्या, केक, पास्ता, जाम, सॅस, मिनरल वॉटर, कॅमेरा, एसी हॉटेल्स, दुरसंचार सेवा, आयटी सेवा इत्यादी.

**५) २८ टक्के कर:** विलासी/चैनीच्या वस्तू व सेवा एसी, फ्रीज, कार, महागडया मोटार सायकल, चॉकलेट, शीतपेय, तंबाखूजन्य उत्पादने, पान मसाला, शॅम्पू, हेअर डाय, वॉटर हिटर, वॉशिग मशीन, लॉटरी/सट्टा इत्यादी.

वस्तू व सेवा कराच्या कक्षेत येणाऱ्या ६० टक्के वस्तू व सेवांवर १८ ते २८ टक्के कर तर सुमारे २० टक्के वस्तू व सेवांवर २८ टक्के कर आकारण्यात आला आहे. विलासी/चैनीच्या/मौजमजेवी



PRINCIPAL
Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist.Ratnagiri.415203

वस्तूंवर अधिक आधिभार आकारून अप्रत्यक्ष कर महसूलातील घट भरपाई केली जाणार आहे.

**• वस्तू व सेवा कर परिघाबाहेरील वस्तू:**

वस्तू व सेवा करप्रणालीतून शेती, स्थावर मालमत्ता, वीज, मद्य, पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक गॅस, विमानाचे इंधन, कच्चे तेल आणि शिक्षण व आरोग्य क्षेत्र यांचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही परंतु उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था प्रवेश प्रक्रिया व वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, खानपान या वस्तू व सेवा कर परिघात समाविष्ठ केलेल्या आहेत.

**• वस्तू व सेवा करामुळे रद्द होणारे कर:**

सरकारला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांपासून जास्तीत जास्त महसूल मिळतो. केंद्र व राज्य सरकारच्या अप्रत्यक्ष करांना पर्याय म्हणून वस्तू व सेवा कर लागू केला आहे. केंद्र शासनाकडून लादले जाणारे अप्रत्यक्ष उदा. कर केंद्रीय उत्पादन कर, अतिरिक्त उत्पादन शुल्क, सेवाकर, विशेष अतिरिक्त सेवा शुल्क, केंद्रीय अधिभार तर राज्य सरकारचे अप्रत्यक्ष कर उदा. मुल्यवर्धित कर, विक्री कर, लॉटरी, जुगार व सट्टेबाजीवरील कर, करमणूक कर, उपकर, अधिभार, चैनीच्या वस्तूंवरील कर, खरेदी कर, जकात व प्रवेश कर अशा साधारण: १५ ते २० प्रकारच्या करांचे विलीनीकरण होऊन देशभर एकच वस्तू व सेवा कर असून जीएसटीनंतरही मालमत्ता कर, व्यवसाय कर मुद्रांक शुल्क या सारखे प्रत्यक्ष कर चालू राहणार आहेत.

**• केंद्र व राज्य सरकारच्या करांना पर्यायी कर आकारणी:** वस्तू व सेवा कर लागू झाल्यावर करदाते फक्त तीन प्रकारचे कर भरणार आहेत. ते खालील प्रमाणे

**१) केंद्रीय वस्तू व सेवा कर:** (CGST-Central Goods & Services Tax) केंद्रीय वस्तू व सेवा कर केंद्र शासनाद्वारे लागू व वसूल केला जाईल. हा कर देशांतर्गत (आंतरराज्य) वस्तू व सेवांच्या विक्रीवर आकारला असून केंद्र शासनाच्या अप्रत्यक्ष करांच्या जागी हा कर लावला जाईल.

**२) राज्य वस्तू व सेवा कर:**
(SGST-State Goods & Services Tax)

हा कर राज्य सरकारच्या सर्व प्रकारच्या अप्रत्यक्ष करांऐवजी आकारला जाईल.

**३) एकात्मिक वस्तू व सेवा कर:**
(IGST-Integrated Goods & Services Tax)

एकात्मिक वस्तू व सेवा कराची आकारणी केंद्र सरकारमार्फत आंतरराज्य पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर असून केंद्र व राज्य वस्तू व सेवा कर यांचे एकत्रिकरण करून आकारला जाणार आहे. या कराची पूर्ण वजावट वस्तू व सेवा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यास मिळणार असल्याने आंतरराज्य विक्री व्यवहारांवर कराचा बोजा शुन्य असेल तसेच आयातीवरील सीव्हीडी व एसएडी लागणार नाही. या करामुळे उत्पादक व ग्राहक या दोघांवरील करांचा बोजा कमी केला जातो.

**• वस्तू व सेवा कराचे फायदे:**

वस्तू व सेवा करांचे सर्वसाधारणपणे फायदे खालील प्रमाणे सांगता येतील.

**१) सोपी व सुटसुटीत कर पद्धती:** वस्तू व सेवा करामुळे कररचनेतील क्लिष्टता व गुंतागुंत कमी करून कररचना सोपी व सुटसुटीत करण्यास मदत होईल.

**२) सरकारी महसूलात वाढ:** वस्तू व सेवा करामुळे शासनाच्या महसूलात वाढ होऊ शकते. एकच करप्रणालीमुळे कार्यक्षमता व पारदर्शकता वाढेल. परिणामी काळाच्या ओघात महसूलात वाढ होईल.

**३) व्यापार व उद्योग क्षेत्राच्या विकासाला चालना:** वस्तू व सेवा करामुळे अनेक कर कायद्यांऐवजी एकच कर कायदा लागू होईल. तसेच या करप्रणालीत संगणकाचा जास्तीत जास्त वापर केला जाणार असल्याने व्यापारी व उद्योग क्षेत्रातील अनेक अडचणी आपोआप दूर होतील.

**४) कररचनेत पारदर्शकता:** एकच करप्रणालीमुळे कररचना सुलभ व सुटसुटीत होईल. त्याचबरोबर या करप्रणालीमुळे कर चुकवेगिरीसारख्या अनेक अडचणींवर मात करून व्यवहारात पारदर्शकता निर्माण होईल.

**५) ग्राहकांचा फायदा:** वस्तू व सेवा करप्रणलीत अनेक करांऐवजी एकच कर आणि करावर कर लागत नसल्याने वस्तूंच्या किंमती कमी होतात. तसेच एकच वस्तूच्या सर्वत्र किंमती समान असणार आहेत.



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad Dist.Ratnagiri 415203

६) सर्वसामान्य नागरीकांचा फायदा:

वस्तू व सेवा करात जीवनाश्यक वस्तूंवरील कर शुन्य टक्के असून शिक्षण व आरोग्य क्षेत्र करमुक्त आहे. त्यामुळे असा वस्तू व सेवा चांगल्या व स्वस्त उपलब्ध होतील. परिणामी सर्वसामान्य नागरिकांचा फायदा होतो.

वस्तू व सेवा कर केंद्र व राज्य सरकारच्या अनेक अप्रत्यक्ष करांना एक पर्यायी कर असून एक देश, एक कर व एक बाजारपेठ अशा करप्रणालीमुळे देशात एकाच वस्तूची किंमत सर्वत्र एकसारखी असणार आहे. कर दर रचनेमध्ये जीवनाश्यक वस्तू करमुक्त (शुन्य कर) आणि गैरवाजवी वस्तू व सेवांवर अधिकच्या कर आकारणीमुळे सर्वसामान्य नागरीकांना दिलासा मिळू शकतो. देशभरातील एकच करप्रणालीचा व्यापारी व उद्योग क्षेत्राला लाभ होणार आहे. कर चुकवेगिरी व भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालण्यासाठी ही पद्धती उपयुक्त ठरू शकते. जीएसटीमुळे करदाते किचकट, गुंतागुंतीच्या कर विळख्यातून बाहेर पडणार असून उत्पादक व उपभोक्त्यांवर कराचा समान भर पडणार आहे. परंतु पेट्रोल, डिझेल सारख्या वस्तू कर कक्षेतून बाहेर आल्याने भविष्यात याचे अनिष्ठ परिणाम झालेले दिसून येतील. वस्तू व सेवा कर हा देशाच्या कर रचनेतील आमुलाग्र बदल असून ही एक आर्थिक इतिहासातील अभुतपूर्व घटना आहे.

• संदर्भ •

१) सुधीर बीरजे, वस्तू व सेवा कर अधिनियम तोंडओळख, अजित प्रकाशन, २०१७.
२) V.S. Datey, GST Ready Reckoner, Taxmann's Publication, Nov.2017.
३) The Goods & Service Tax (GST) Reports, Ajit Prakashans, 2017.
४) महाराष्ट्र शासन, विक्री कर विभाग अहवाल, वस्तू व सेवा कर—एक दृष्टिक्षेप, २०१७.
५) योजना मासिक, वस्तू व सेवा कर, ऑगस्ट २०१७, अंक—१.
६) विविध संकेत स्थळे.

❑❑❑

29

# महाविद्यालयीन ग्रंथपालाचे कार्यसमाधान—एक अभ्यास

**प्रा. रेवाराम एम. मालखेडे**
ग्रंथपाल
राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय,
सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर

**********

**सार:—**

ग्रंथालय व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे. पुस्तके अथवा माहितीचे स्त्रोत वेळेवर योग्यरित्या सापडावेत यासाठी कशारीतीने रचना असली पाहिजे याचे भान ठेवून ग्रंथालयाचे व्यवस्थापन केले जाते. त्यासाठी काही पद्धती वापरल्या जातात. या पद्धती म्हणजे वर्गीकरण, तालिकीकरण होत. वर्गीकरण इत्यादीसाठी अनेक संगणक प्रणालीही आता उपलब्ध आहेत. नवीन तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन ग्रंथालय इतर ग्रंथालयासोबत साखळीत जोडणे आवश्यक असते. यामुळे कोणतेही पुस्तक कुठेही परत करणे सोपे होते, आणि इतर ग्रंथालयातील पुस्तके पण कोठेही नाममात्र फी मध्ये उपलब्ध होऊ शकतात. यासाठी संगणीकरण मोठीच मदत करू शकते.

**प्रस्तावना:—**

मानवाचा उत्क्रांती पासूनच माहितीचा उपयोग ह्या ना त्या कारणासाठी, तसेच कोणत्याना कोणत्या तरी स्वरूपात नेहमीच करावा लागत आहे. पूर्वीच्या काळी उपलब्ध माहिती ही कोरून ठेवीत असत किंवा चित्रस्वरूपात सुरक्षित ठेवीत असत. मानवाचा जसजसा विकास होत गेला तसतशी माहिती सुरक्षित साठवून ठेवण्याची पद्धती बदलली. इतकेच नव्हे तर माहितीच्या प्रकारात व स्वरूपात सुद्धा बदल झालेत. माहिती साठवून ठेवण्याकरीता कागदाचा वापर करण्यात आला. माहितीच्या स्वरूपातही बदल



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandrup, Dist.Ratnagiri 415208